# प्रथमोपचार प्रशिक्षण (भाग २)

## रक्तस्राव, जखम, अस्थीभंग, स्नायूंच्या दुखापती इत्यादींवर प्रथमोपचार

## विषयसूची


१. सनातन संस्थेचे संस्थापक परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय ! ४

२. ग्रंथाच्या संकलकाचा परिचय ५

३. ग्रंथाचे मनोगत ६

卐 प्रकरणे

१. रक्तस्राव आणि जखम ७

२. अस्थीभंग ४१

३. स्नायू आणि अस्थीबंधने यांच्या दुखापती, सांधा निखळणे अन् पोटरीच्या स्नायूंत गोळा येणे ८०

४. ड्रेसिंग, बँडेज आणि झोळी (स्लिंग) ८७

५. हिंदु जनजागृती समितीच्या विनाशुल्क 'प्रथमोपचार प्रशिक्षणवर्गा'त सहभागी व्हा ! ११०



### सनातनच्या चैतन्यमय ग्रंथसंपदेची ठळक वैशिष्ट्ये !

卐 अध्यात्मातील प्रत्येक कृतीविषयी 'का अन् कसे' यांची शास्त्रीय उत्तरे !

卐 विज्ञानयुगातील वाचकांना समजेल अशा आधुनिक वैज्ञानिक भाषेतील (उदा. टक्केवारी) ज्ञान !

卐 तात्त्विक विवेचनच नव्हे, तर साधना कृतीत आणण्याविषयी मार्गदर्शन !

卐 अध्यात्मातील विविध गोष्टींच्या संदर्भात वैज्ञानिक उपकरणांद्वारे केलेले संशोधन, सूक्ष्म स्तरावरील प्रक्रिया दर्शवणारी चित्रे अन् लिखाण !


**टीप** ग्रंथातील काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी अक्षरांत संकेतांक वा सांकेतिक चिन्हे कार्यालयीन सोयीसाठी दिली आहेत. त्यांचा लिखाणाशी संबंध नाही. काही अपरिहार्य कारणामुळे काही संकेतांक इंग्रजीत ठेवले आहेत.

## विषयसूचीतील क्रमांक ३

### ग्रंथाचे मनोगत

सर्वसाधारणपणे 'प्रथमोपचार' म्हणजे रुग्णाला वैद्यकीय उपचार मिळेपर्यंत त्याच्यावर केले जाणारे प्राथमिक उपचार होत ! सध्याची धकाधकीची जीवनशैली, तसेच भावी तिसरे महायुद्ध, नैसर्गिक आपत्ती, दंगली आदींचा विचार करता समाज आणि राष्ट्र यांच्याप्रतीचे कर्तव्य म्हणून 'प्रथमोपचार प्रशिक्षण' प्रत्येक सुजाण नागरिकाने घेणे आवश्यक झाले आहे. किरकोळ स्वरूपाच्या जखमेतून रक्तस्राव झाल्यास सामान्यपणे कोणी गोंधळून जात नाही. एखादी गंभीर दुखापत होते, तेव्हा मात्र 'नेमके काय करायला हवे आणि काय करायला नको', याविषयी अनेकांचा गोंधळ होऊ शकतो. जखमेतून मोठा रक्तस्राव होणे, हाड मोडणे, स्नायूंना दुखापत होणे, सांधा निखळणे, स्नायूंत गोळा येणे आदीप्रसंगी करावयाचे प्रथमोपचार या ग्रंथात दिले आहेत. याचसोबत 'ड्रेसिंग, बँडेज आणि झोळी (स्लिंग)' या प्रकरणातून संबंधित कृती कशा कराव्यात, हे समजणे सुलभ होईल.

'प्रथमोपचार प्रशिक्षण (३ भाग)' ही ग्रंथमालिका वाचून आणि प्रथमोपचार प्रशिक्षण घेऊन प्रत्येक सुजाण नागरिक उत्तम प्रथमोपचारक बनावा', ही श्री गुरुचरणी प्रार्थना ! – **संकलक**

### 'प्रथमोपचार प्रशिक्षण' या ग्रंथमालिकेत काही ठिकाणी इंग्रजी शब्द वापरण्यामागील कारण

सनातन संस्था स्वभाषारक्षण आणि भाषाशुद्धी यांविषयी आग्रही आहे. सनातनने 'स्वभाषारक्षण अन् भाषाशुद्धी चळवळ' राबवण्यासाठी ग्रंथमालिकेची निर्मितीही केली आहे. असे असतांनाही प्रस्तुत ग्रंथमालिकेत काही इंग्रजी शब्द तसेच ठेवले आहेत; कारण ते तसेच व्यवहारात आणि वैद्यकीय क्षेत्रात प्रचलित आहेत. या शब्दांना मराठी प्रतिशब्द वापरल्यास ते वाचकांना बोजड वाटू शकतील आणि कदाचित विषय समजून घेण्यातील त्यांचे स्वारस्य घटू शकेल. वाचकांनी विषय समजून घेणे, याला आम्ही प्राधान्य दिले आहे. हिंदु राष्ट्रात मात्र इंग्रजी शब्दांच्या स्थानी स्वकीय शब्दच प्रचलित केले जातील.